# महिला कक्ष

# अहवाल २०२२-२३

तपस्वी पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट संचालित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

समर्थ नगर, सांजा रोड, उस्मानाबाद

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद




राष्ट्रसेविका समिती युवती विभाग, देवगिरी प्रांत, आर्य चाणक्य विद्यालय व महिला कक्ष, व्यंकटेश महाजन महाविद्यालय, उस्मानाबाद यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्ररक्षक जवानांसाठी राख्या व कृतज्ञता पत्र हस्तांतरण कार्यक्रम दि. २९/०७/२०२२




GPS Map Camera
Sadav Traders
Ak Traders
Maps
Osmanabad, MH, India
Swapnavihar Colony, Osmanabad,
Lat 18.187433, Long 76.046704
07/29/2022 12:08 PM


GPS Map Camera
Sadav Traders
Ak Traders
Maps
Osmanabad, MH, India
Osmanabad, Osmanabad, 413501,
Lat 18.187290, Long 76.046972
07/29/2022 12:06 PM


GPS Map Camera
Osmanabad, MH, India
Waruda Road, Swapnavihar Colony,
Lat 18.187724, Long 76.046009
07/29/2022 12:08 PM


GPS Map Camera
Osmanabad, MH, India
Samarth Nagar, Osmanabad,
Lat 18.188010, Long 76.046647
07/29/2022 12:10 PM
Sadav Traders
Maps


GPS Map Camera
Osmanabad, MH, India
Swapnavihar Colony, Osmanabad,
Lat 18.187610, Long 76.046688
07/29/2022 11:56 AM
Sadav Traders
Ak Traders
Maps



# राष्ट्ररक्षक जवानांसाठी राखी व पत्र हस्तांतरण कार्यक्रम

**शुक्रवार, दि.२९ /०७ /२०२२**

**उद्दिष्ट :**

विद्यार्थिनींमध्ये राष्ट्ररक्षक जवानांप्रती आदर व आपुलकी निर्माण व्हावी तसेच त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करावी या उद्देशाने हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

शुक्रवार दि.२९/०७/२०२२ रोजी सकाळी ११.३० ते १२.३० या वेळेत राष्ट्र सेविका समिती,युवती विभाग देवगिरी प्रांत यांच्या सहकार्याने आणि आर्य चाणक्य प्रशाला व महिला कक्ष व्यंकटेश महाजन महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने राष्ट्र रक्षक जवानांसाठी राख्या व पत्र हस्तांतरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी राष्ट्र सेविका समिती धाराशिव च्या पदाधिकारी श्रीमती कठारे,सौ.अपर्णा चौधरी व सौ.नायगावकर तसेच आर्य चाणक्य प्रशालेतील सौ.आशा कुलकर्णी यांची प्रमुख उपस्थिती होती.

राष्ट्र सेविका समिती,युवती विभाग देवगिरी प्रांत यांच्या वतीने राष्ट रक्षक जवानांना त्यांच्या राष्ट्र रक्षक कार्याप्रती कृतज्ञता म्हणून राखी व कृतज्ञता पत्र पाठविण्याचा उपक्रम हाती घेण्यात आला होता.याच उपक्रमाचा एक भाग म्हणून महाविद्यालयाचा महिला कक्ष व आर्य चाणक्य प्रशालेतील विद्यार्थिनी यांच्या संयुक्त विद्यमाने राख्या तयार करून व जवानांसाठी कृतज्ञता पत्र लिहून घेऊन समितीच्या पदाधिकाऱ्यांकडे हस्तांतरित करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरवातीला भारतमातेच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले.त्यानंतर महिला कक्ष व इतिहास विभाग प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी जे.आर. यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. विद्यार्थिनींनी लिहिलेल्या निवडक पत्रांचे वाचन करण्यात आले.त्यानंतर राष्ट्र सेविका समितीच्या श्रीमती नायगावकर यांनी विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले.यानंतर राख्या व पत्रांचे हस्तांतरण राष्ट्र सेविका समितीच्या पदाधिकाऱ्यांकडे करण्यात आले.शेवटी सौ.आशा कुलकर्णी यांनी आभार प्रदर्शन केले व सामुहिक पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

यावेळी शाळा महाविद्यालयातील ३२ विद्यार्थिनी व ०७ महिला शिक्षक कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्र संचालन प्रा.डॉ.कुलकर्णी जे.आर. यांनी केले.

**उद्दिष्टपूर्ती :**

विद्यार्थिनींमध्ये सीमेवरती उभे राहून अथकपणे राष्ट्र रक्षण करणाऱ्या राष्ट्ररक्षक जवानांप्रती आदर व आपुलकी निर्माण होण्यास मदत झाली. तसेच त्यांच्या कार्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणाच्या निमित्ताने विद्यार्थिनींमध्ये राष्ट्रीय भावना जागृत झाली.

तपस्वी पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट संचालित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

समर्थ नगर, सांजा रोड, उस्मानाबाद

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद




**भाजप राज्य महिला आघाडी अध्यक्षा चित्राताई वाघ आणि अर्चनाताई पाटील यांचा विद्यार्थिनींशी "सामाजिक स्वास्थ्य व समस्या" या विषयावर संवाद. दि. ०९/०१/२०२३**

**उपस्थिती – संस्था सचिव ॲड. मिलिंद पाटील, भाजप माजी जिल्हाध्यक्ष्य श्री. नितीन काळे**





भाजप राज्य महिला आघाडी अध्यक्षा चित्राताई वाघ व अर्चनाताई पाटील विद्यार्थी व कर्मचारी यांच्या सोबत संवाद साधताना. दि. ०९/०१/२०२३





भाजप राज्य महिला आघाडी अध्यक्षा चित्राताई वाघ विद्यार्थिनी व कर्मचारी यांच्याशी अनौपचारिक संवाद साधताना. दि. ०९/०१/२०२३



# भाजप राज्य महिला आघाडी अध्यक्षा चित्राताई वाघ यांचा विद्यार्थिनींशी संवाद

**सोमवार, दि.०९ /०१ /२०२३**

सोमवार दि.०९/०१/२०२३ रोजी दुपारी १२.०० ते ०२.०० या वेळेत भाजप राज्य महिला आघाडी अध्यक्षा श्रीमती चित्राताई वाघ आणि श्रीमती अर्चनाताई पाटील यांनी विद्यार्थिनी व महिलांमधील सामाजिक जागृतीसाठी काढलेल्या अभियानांतर्गत महाविद्यालयाला भेट दिली.यावेळी महाविद्यालयाच्या महिला कक्षाच्या विनंतीवरून त्यांनी विद्यार्थिनींशी व नंतर सर्व अध्यापक कर्मचाऱ्यांशी संवाद साधला. समाजात वाढत असलेली विकृती, स्त्रीविषयक दृष्टीकोन, याला कारणीभूत यंत्रणा व त्यातून निर्माण होणाऱ्या सामाजिक समस्या आणि अस्वास्थ्य यावर त्यांनी विद्यार्थिनींशी व कर्मचाऱ्यांशी चर्चा केली. विशेषतः विद्यार्थिनींना या विषयावर बोलते करून त्यांच्यात याविषयावर जागृती व स्वसुरक्षतेची भावना निर्माण करण्याचा प्रयत्न केला. समाजातील सोशल मिडीयावर अश्लील फोटो, VIDEO पसरवणाऱ्या व सामाजिक स्वास्थ्य बिघडवणाऱ्या महिलांवर त्यांनी कडाडून टीका केली. भाजप महिला नेत्या अर्चनाताई पाटील यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. प्रा डॉ रसाळ सहदेव यांनी आभारप्रदर्शन केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा.डॉ.प्रशांत चौधरी यांनी केले. तर प्रास्ताविक संस्था सचिव ॲड. मिलिंद पाटील यांनी केले.या वेळी भाजप जिल्हा अध्यक्ष नितीन काळे, माजी जिल्हाध्यक्ष दत्ता कुलकर्णी, इतर पदाधिकारी व कार्यकर्ते तसेच माजी जि.प.अध्यक्ष अस्मिता कांबळे, सौ.प्रेमाताई पाटील इ. उपस्थित होते.

तपस्वी पब्लिक चॅरीटेबल ट्रस्ट संचालित

# व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालय, उस्मानाबाद

समर्थ नगर, सांजा रोड, उस्मानाबाद

संलग्न - डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद



**आरोग्य तपासणी शिबीर उद्घाटन प्रसंगी "GENDER EQUITY" विषयावर संवाद साधताना धारासूरमर्दिनी फेडरेशन, उस्मानाबाद च्या अध्यक्षा सौ. संगीता काळे व प्रास्ताविक करताना प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी दि. ०८/०३/२०२३**






आरोग्य तपासणी शिबीर उद्घाटन प्रसंगी "GENDER EQUITY" विषयावर संवाद – उपस्थित विद्यार्थी, अध्यापक व शहरातील महिला दि. ०८/०३/२०२३




आरोग्य तपासणी शिबीर उद्घाटन प्रसंगी CIVIL HOSPITAL, OSMANABAD चे श्री. राठोड व MAHA-LAB चे कर्मचारी दि. ०८/०३/२०२३













**आरोग्य तपासणी शिबिरांतर्गत BLOOD PRESSURE, SUGAR, CBC, THYROID, LFT, KFT ई. तपासणी करताना MAHA-LAB चे कर्मचारी दि. ०८/०३/२०२३**



पुरोगामी विचाराचे

# एकमत

page- 7

10 Mar 2023

## महाजन महाविद्यालयात आरोग्य तपासणी

**धाराशिव : प्रतिनिधी**

येथील व्यंकटेश महाजन वरिष्ठ महाविद्यालयामध्ये जागतिक महिला दिनानिमित्त आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी धारासूरमर्दिनी महिला फेडरेशनच्या अध्यक्षा संगीता काळे, कोषाध्यक्ष स्मिता कठारे, प्रा. डॉ.मकरंद चौधरी, प्रा.दिनकर रासवे, प्रा.डॉ.जयश्री कुलकर्णी, जिल्हा रुग्णालयाचे डॉ. विक्रांत राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. या शिबिरात रक्तदाब, शुगर, थायरॉईड, एल. एफ. टी, के. एफ. टी या तपासण्या करून घेण्यात आल्या. जवळपास जणांची तपासणी केली.ही तपासणी करण्यासाठी अक्षय माने, श्रद्धा कांबळे, अक्षय घुले, अमोल मगर, निखिल कदम, श्रीनिवास निर्मळ यांनी सहाय्य केले.

# झटपट बातम्या

## आरोग्य : महाजन महाविद्यालयातील शिबिरात १५० जणांची तपासणी



**धाराशिव |** येथील व्यंकटेश महाजन महाविद्यालयात महिला दिनानिमित्त आरोग्य शिबिरात १६० जणांची तपासणी केली. वरिष्ठ महाविद्यालय, व्होकेशनल महाविद्यालय, जिल्हा रुग्णालय, रोटरी क्लब व धारासूरमर्दिनी महिला फेडरेशनच्या संयुक्त विद्यमाने शिबिर घेतले. उद्‌घाटनप्रसंगी धारासूरमर्दिनी महिला फेडरेशनच्या अध्यक्षा संगीता काळे, कोषाध्यक्ष स्मिता कठारे, प्रा. डॉ. मकरंद चौधरी, प्रा. दिनकर रासवे, महिला कक्षप्रमुख प्रा. डॉ. जयश्री कुलकर्णी, सिव्हिलचे डॉ. विक्रांत राठोड उपस्थित होते.

**वर्तमान पत्रातील बातमीचे कात्रणे**

# जागतिक महिला दिनानिमित्त महिला सबलीकरण व लिंगभेद नि:पक्षता विषयक मार्गदर्शन व आरोग्य तपासणी कार्यक्रम

**बुधवार, दि.०८ /०३ /२०२३**

**उद्देश :-**

विद्यार्थ्यांमध्ये पारंपारिक लिंगभेद वृत्तीला छेद देऊन लिंगसमानतेची.. लिंगभेद नि:पक्षतेची भावना रुजविणे, महाविद्यालय व समाजामध्ये स्त्री-पुरुष समानतेचे निकोप वातावरण निर्माण करण्यासाठी प्रयत्न करणे आणि त्यासाठी भारतीय समाजातील उपेक्षित महिलांचे सबलीकरण करण्याची आवश्यकता समजावून सांगणे, सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाड प्रकरणांना आळा घालणे व त्यासंबधी जागृती निर्माण करणे आणि सोबतच आरोग्यतपासणी द्वारे आरोग्य विषयक सतर्कता निर्माण करण्याचा प्रयत्न करणे हा या कार्यक्रम आयोजनामागे असलेला उद्देश होय.

बुधवार दि.०८/०३/२०२३ रोजी जागतिक महिला दिनानिमित्त लिंगसमानता विषयक मार्गदर्शन व आरोग्य तपासणी शिबीर असा कार्यक्रम महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग, अंतर्गत तक्रार समिती व महिला कक्ष यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच महिला फेडरेशन,धाराशिव, रोटरी क्लब,धाराशिव, महालॅब व सिव्हील हॉस्पिटल,धाराशिव यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा .डॉ.प्रशांत चौधरी, धारासूरमर्दिनी महिला फेडरेशन,धाराशिवच्या अध्यक्षा सौ.संगीता काळे आणि इतर सदस्य, रोटरी क्लब,धाराशिवचे अध्यक्ष प्रमोद दंडवते व इतर सदस्य, महालॅब,धाराशिवचे श्री अक्षय माने, त्यांचे सहकारी व सिव्हील हॉस्पिटल,धाराशिवचे अधिकारी श्री राठोड हे उपस्थित होते.

सकाळी १०.३० वाजता आयोजित उद्घाटनपर कार्यक्रमात सर्वप्रथम मान्यवरांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अतिथींच्या स्वागत-सत्कारानंतर महविद्यालयाच्या महिला कक्ष प्रमुख प्रा.डॉ.कुलकर्णी जे. आर. यांनी स्वागतपर प्रास्ताविक केले. त्यानंतर प्रमुख वक्त्या आणि धारासूरमर्दिनी महिला फेडरेशन,धाराशिवच्या अध्यक्षा सौ.संगीता काळे यांनी महिला सबलीकरण, लिंगभेद नि:पक्षता.. लिंगसमानता या विषयाला अनुषंगून उपस्थितांना उद्बोधित केले. तर महालॅब,धाराशिवचे श्री अक्षय माने यांनी आरोग्यविषयक विविध चाचण्या-तपासण्या आणि त्यांची आवश्यकता याविषयी माहिती दिली आणि या उद्घाटन सत्रानंतर होणाऱ्या रक्तदाब,मधुमेह, थायरॉइड,C.B.C., LFT, KFT या मोफत तपासण्या करून घेण्याचे आवाहन केले. सकाळी ११.३० वाजता आरोग्य तपासणीस सुरुवात केली. महाविद्यालयातील अध्यापक-कर्मचारी, विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि परिसरातील महिला अशा एकूण जणांच्या रक्तदाब,मधुमेह, थायरॉइड,**C.B.C., LFT, KFT** इत्यादी तपासण्या महालॅब व सिव्हील हॉस्पिटल,धाराशिव यांच्या वतीने करण्यात आल्या.

या कार्याक्रमाचे सूत्रसंचालन बी एस्सी तृतीय वर्षाच्या विद्यार्थिनी कु. केत प्रणाली हिने केले, तर आभारप्रदर्शन महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे प्रमुख कार्यक्रमअधिकारी प्रा. डॉ. मकरंद चौधरी यांनी केले. कार्यक्रमास ४८ विद्यार्थी-विद्यार्थिनी, तसेच अध्यापक-कर्मचारी व विविध संघटनांचे सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाच्या नियोजनात महाविद्यालयाच्या अंतर्गत तक्रार समितीच्या समन्वयक प्रा. लिंगे ए. एस.यांनी महत्वपूर्ण भूमिका निभावली.

**उद्दिष्टपूर्ती :**

मार्गदर्शक सौ संगीता काळे यांच्या प्रभावी मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांमध्ये पारंपारिक स्त्री-पुरुष भेद, समाजामध्ये स्त्री-पुरुष समानतेची गरज, लिंगसमानतेची.. लिंगभेद नि:पक्षतेची भावना रुजविण्याची गरज, सार्वजनिक ठिकाणी होणाऱ्या छेडछाड प्रकरणांना आला घालण्याची युवकांची जबाबदारी आणि भारतीय समाजातील उपेक्षित महिलांचे सबलीकरण करण्याची आवश्यकता याबाबत जाणीव व जागृती निर्माण करण्यास मदत झाली.